Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

Date: 27/10/2025

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या बातम्या, आतल्या बातम्या...
आपलं महानगर My महानगर.com
www.mymahanagar.com

## दिनविशेष

### स्वातंत्र्य लढ्यातील क्रांतिकारक जतिन दास



क्रांतिकारक जतिन दास यांचा जन्म २७ ऑक्टोबर १९०४ रोजी बंगाल प्रांतातील कलकत्त्यात (सध्याचे कोलकाता, पश्चिम बंगाल) झाला. त्यांच्या वडिलांचं नाव बंसीलाल दास होतं. घरातील वातावरण शिस्तबद्ध, संस्कारी आणि शिक्षणाला महत्त्व देणारं होतं. त्यांचे कुटुंब धार्मिकतेबरोबरच राष्ट्रप्रेमानेही भारलेले होते. त्यामुळे लहान वयातच जतिन दास यांच्यावर देशप्रेम, सामाजिक न्याय आणि तत्त्वनिष्ठ विचारांची बीजं रोवली गेली. बालपणात ते शिस्तप्रिय, जिज्ञासू आणि विचारशील होते.

जतिन दास यांनी आपलं शिक्षण काठियाबाद स्कूल आणि पुढे प्रेसिडेन्सी कॉलेज, कोलकाता येथे पूर्ण केलं. ते अभ्यासात हुशार होते. वाचनाची आणि राजकीय घडामोडी समजून घेण्याची तीव्र आवड असलेले विद्यार्थी होते. महात्मा गांधींच्या असहकार चळवळीने आणि बंगालमधील क्रांतिकारक वातावरणाने त्यांना प्रचंड प्रेरणा दिली. विद्यार्थीदशेत असतानाच त्यांच्यात राजकीय जागृती झाली आणि त्यांनी राष्ट्रासाठी काहीतरी करण्याची आकांक्षा बाळगली. स्वदेशी चळवळ, बहिष्कार चळवळ, आणि राष्ट्रीय जागृतीचा प्रभाव त्यांच्यावर किशोरवयातच पडला होता. त्यांनी विदेशी कपड्यांचा त्याग केला आणि स्वदेशी वापराचा आग्रह धरला. ते गांधीजींच्या विचारांनी प्रभावित झाले होते, पण त्यांनी अहिंसेच्या व्याख्येतील मर्यादादेखील ओळखल्या. जतिन दास यांनी १९२९ मध्ये लाहोर तुरुंगात असताना इतर राजकीय कैद्यांप्रमाणे ब्रिटिश तुरुंग प्रशासनाच्या भेदभावपूर्ण वागणुकीविरुद्ध उपोषण सुरू केलं. त्यांचे उपोषण संपूर्ण ६३ दिवस चाललं, जे भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात एक ऐतिहासिक आणि प्रेरणादायक सत्याग्रह मानला जातो. शेवटी शरीराने साथ देणं बंद केलं आणि १३ सप्टेंबर १९२९ रोजी जतिन दास यांचा मृत्यू झाला.

Nashik Edition

Oct 27, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401